# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८

## इ क्षेत्रीय विदयुत विभाग भोसरी कार्यालय -३९

---

(मॅन्युअल क्र.३)

## निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पध्दत पर्यवेक्षण आणि जबाबदारी.

कलम ४ (१) (b) (ii) नमुना (ब)

# पि. चि. म. न. पा येथील विदयुत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्यांचा तपशील

| अ.क्र | पदनाम | कर्तव्ये | कोणत्या कायदया/नियम/शासन निर्णय परीपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता(वि) | प्रभागाअंतर्गत कामावर नियंत्रण ठेवणे अंदाजपत्रक तयार करणे, कामांची बीले अदायगी करणे, लाईटबीले,टेलिफोन, मोबाईल बीले अदा करणे, र.रु.१०,०००/- पर्यंत वाहन दुरुस्ती व वाहन इंधन बीले मंजूर करणे र.रु १०,०००/- पर्यंत वाहन दुरुस्ती व वाहन इंधन बीले मंजूर करणे. कर्मचा-यांना घर बांधणी कर्ज, वाहनकर्ज अदा करणे. वर्ग २, मधील कर्मचा-यांच्या ३० दिवसापर्यंत अर्जित रजा व सर्व प्रकारच्या कालावधीच्या परावर्तीत रजा, अर्धवेतनी रजा, क्षयरोग, कुष्ठरोग, पक्षघात, विकलांगता, प्रसुती , गर्भपात इ. विशेष रजा मुजूर करणे. वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांचे दक्षता रोध मंजूर करणे. नियमित वेतनवाढी मंजूर करणे, बेशिस्तपणाचे वर्तनाबाबत शास्ती लावणे, दंड करणे, कोणत्याही आर्थिक हानीची रक्कम वसूलात आणणे. रस्त्यावरील दिवाबत्ती प्रशासकीय इमारत, शाळा, रुग्णालये, दवाखाने, उदयाने, मैलाशुध्दीकरण केंद्र यांचे विदयुत/यांत्रिकी व व नविन प्रकल्पावर देखरेख करणे प्रभाग समितीस विषयपत्र पाठविणे, पदाधिकारी व नागरिकांच्या तक्रारी व सुचनांवर त्वरीत कार्यवाही करणे. आहरण वितरण अधिकारी म्हणून काम पाहणे. प्रभागाअंतर्गत कामावर नियंत्रन ठेवणे | १)प्रशासन/१/कावि/७७९/९५ दिनांक ३०.१०.१९९५<br>२)प्रशासन/१/कावि/७२९/२००६ दिनांक २१.०८.२००६<br>३)प्रशासन/१/कावि/३०/२००३ दि.१/१२/२००३<br>४)प्रशासन/१/कावि/६०३/१९९४/ दि.१७.१०.१९९४ | |
| २ | उपअभियंता(वि) | वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांच्या किरकोळ रजा, वैकल्पिक रजा मंजुर करणे वर्ग ३ व ४ च्या कर्मचा-यांच्या ३० दिवसापर्यंत च्या रजा मंजुर करणे . तसेच सेवानोंद पुस्तकात सर्व प्रकारच्या नोंदी घेणे. कर्मचा-यांचे बेशिस्तपणाचे वर्तनाबाबत ज्ञापन नोटीस व ताकीद देणे. देखभाल दुरुस्तीचे कामांवर नियंत्रण ठेवणे. ऑडीट नियमांप्रमाणे काम करणे. प्रभागाअंतर्गत विकास कामांवर नियंत्रन ठेवणे विदयुत विषयक कामांचे, नियोजन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, येणा-या खर्चास तरतूदीनसार संबंधित समितीकडून मान्यता घेणे, कामांचे बीले अदा करणे, म.रा.वि.वि.कं. तसेच इतर विभागांशी समन्वय साधून पत्रव्यव्हार करणे, पदाधिकारी व नागरिक यांचे तक्रारी व सूचनांवर त्वरीत कार्यवाही करणे. | १)प्रशासन/१/कावि/६३०/१९९४ दि.ज१७/१०/१९९४<br>२)प्रशासन/१/कावि/७७९/१९९५ दि.३०.१०.१९९५ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | कनिष्ठ अभियंता (वि) | विदयुत विषयक कामांचे नियोजन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, येणा-या खर्चास तरतूदीनुसार संबंधित समितीकडून मान्यता घेणे बाबत सर्व कामे करणे, कामावर प्रत्यक्ष देखरेख ठेवणे, त्याचप्रमाणे कामाचे बील तयार करणे, एम.बी.रेकॉर्डिंग करणे, म.रा.वि.वि.कं. तसेच इतर विभागांशी समन्वय साधून पत्रव्यव्हार करणे, पदाधिकारी व नागरीक यांचे तक्रारी व सूचनांवर त्वरीत कार्यवाही करणे. वीजपर्यवेक्षक व तांत्रिक कर्मचारी यांना कामाबाबत सूचना देणे, व त्यांचे किरकोळ रजा मंजूर करणे. स्टॉक रजिस्टर मेंटेन करणे, ऑडीट नियमांप्रमाणे काम करणे. नमुण दिलेल्या कार्यक्षेत्रातील विदयुत विषयक कामाची अंमलबजावणी बाबत सर्व जबाबदारी. लेखा परिक्षण विषयक कामकाज | | |
| ४ | मख्य लिपिक | आस्थापनाविषयक सर्व कामकाज, लेखापरिक्षणाबाबत सर्व कामाकाज, रजा मुजूरीबाबत सर्व कामे, स्थावर जंगम मालमत्ता, भांडार साहित्य याबाबत लिपिकाने केलेल्या कामकाजावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवून त्यांना मार्गदर्शन करुन त्यातील त्रुटीबाबत कामकाज करणे. अभिलेख कक्षात अ,ब,क,ड नुसार वर्गवारी करुन रेकॉर्ड लावणे.लेखापरिक्षण विषयक कामकाज | | |
| ५ | लिपिक | अंदाजपत्रक तयार करणे, सर्व प्रकारची अग्रीमधन मंजूर करणे, वैदयकीय बीले अदा करणे. आवक, जावक, पगारबिल, रजा मंजूरी, कर्मचारी बेशिस्तवर्तन यासाठी नोटीस प्रसिध्दी व त्याबाबत इतर कामकाज करणे, बदल्या नेमणूकाबाबत कामे, प्रशासन विभागाकडील मागविणेत आलेलीद माहिती वेळेत पूर्ण करणे, प्रशिक्षण व सेमिनार करिता अधिकारी व कर्मचारी यांना पाठविणेबाबतची सर्व कामे करणे. वरिष्ठांच्या सुचनेनुसार वेळोवेळी नुमूण दिलेले काम करणे. लेखापरीक्षण विषयक कामकाज | | |
| ६ | वीजपर्यवेक्षक | विदयुत विषयक कामावर देखरेख ठेवणे, तांत्रिक कर्मचा-यांना काम वाटप करणे व त्याचे नियंत्रण ठेवणे, विभागातर्गत कामासाठी लागणारे साहित्य भांडारातून मागविणे व त्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये अदयावत ठेवणे, पदाधिकारी व नागरिक यांचे तक्रारी व सुचनांवर त्वरीत कार्यवाही करणे. अभिलेख विषयक कामे करणे. | | |
| ७ | वीजतंत्री | रस्त्यावरील दिवाबत्ती, प्रशासकीय इमारत, शाळा, रुग्णालये, दवाखाने, उदयाने, यांचे विदयुत/यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्ती विजपर्यवेक्षक यांनी दिलेल्या सुचनेनुसार करणे. | | |
| ८ | तारतंत्री | रस्त्यावरील दिवाबत्ती व प्रशासकीय इमारती मधील, विदयुत/यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्तीची कामे करणे कनिष्ठ अभियंता/ विजपर्यवेक्षक यांनी दिलेल्या | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सुचनेनुसार करणे. | | |
| ९ | जनरेटर ऑपरेटर | प्रशासकीय इमारती, रग्णालेय, दवाखाने, जकात नाका इ. ठिकाणी असलेल्या जनित्रसंच चालु बंद करणे. त्यासाठी डिझेलचे आवश्यकतेनुसार साठा उपलब्ध करणेबाबत कामे, रजिस्टर मेंटेन करणे. | | |
| १० | लिफ्टमन | लिफ्ट चालन करणे. | | |
| ११ | मदतनीस | तारतंत्री व वीजतंत्री यांना त्यांचे कामात मदत करणे. | | |
| १२ | शिपाई | कार्यालयीन स्वच्छता करणे, वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार काम करणे. | | |
| १३ | ऑपरेटर | रस्त्यावरील दिवाबत्ती व प्रशासकीय इमारती मधील, विदयुत/यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्ती ची कामे करणे. कनिष्ठ अभियंता / विजपर्यवेक्षक यांनी दिलेल्या सूचनेनुसार करणे. | | |
| १४ | मेंट. हेल्पर | तारतंत्री व वीजतंत्री यांना त्यांचे कामात मदत करणे. | | |
| १५ | वाहनचालक | अधिका-यांच्या सुचनेनुसार वाहन चालवून त्यांना इच्छित स्थळी ने - आण करणे. | | |

कलम ४ (१) (a) (iii)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील इ क्षेत्रिय विदयुत विभाग भोसरी कार्यालय येथील सार्वजनीक प्राधिकरनात कोणताही निर्णय घेताना पाळली जाणारी निर्णय प्रक्रियेची आणि त्यावरील देखरेखीची पध्दत आणि सोपवलेले जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करुन कार्यपध्दतीचे प्रकाशन

कामाचे स्वरुप

संबंधित तरतुद

अधिनियमाचे नाव

नियम

शासन निर्णय

परिपत्रके

कार्यालयीन आदेश

| अ.क्र | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभागा मधील विकास कामे/ देखभाल दुरुस्ती कामे. | कामाच्या स्वरुपानुसार | कामाच्या आदेशात दिलेला कालावधी | कनिष्ठ अभिंयता /उप अभियंता यांनी दैंनदिन कामावर देखरेख ठेवणे, कामाची मोजमापे घेणे व त्यानुसार बीले अदायगीसाठी सादर करणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी करणे व बीले अदायगी करणे. |

कलम ४ (१) (b) (iii)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील इ क्षेत्रीय विदयुत विभाग भोसरी कार्यालय येथील सार्वजनिक प्राधिकरणात कोणताही निर्णय घेताना पाळली जाणारी निर्णय प्रक्रियेची आणि त्यावरील देखरेखीची पद्धत आणि सोपवलेले जबाबदारीचे उत्तरदायित्व

१) कामाचे स्वरुप संबंधित
तरतुद संबधित तरतुद
अधिनियमाचे नाव
नियम
शासन निर्णय
परिपत्रके
कार्यालयिन आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील इ क्षेत्रीय विदयुत विभाग भोसरी कार्यालय येथील, सार्वजनीक प्राधिकरणात होणा-या कामासंबंधी सर्व सामान्यपणे ठरलेली भौतिक आर्थीक उद्दीष्टे. संस्था पातळीवर ठरलेली / मासिक /त्रैमासिक /अर्धवार्षीक अथवा वार्षीक उद्दीष्टे.

| अ.क्र | अधिकार पद | काम | भौतिक उद्दीष्टे | आर्थिक उद्दष्टे | कालावधी असल्यास | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १)प्रभागा मधील विकास कामे २)प्रभागामधील देखभाल दुरुस्ती कामे. | १)स्थापत्य विभागाच्या कामानुसार विदयुत विषयक विकास कामे करणे. २)प्रभागामधील देखभाल दुरुस्ती कामे नागरिकांच्या सोईसाठी करणे. | कामाच्या स्वरुपानुसार खर्चाची मर्यादा कामाच्या आदेशानुसार पाळणे. विविध उपाय योजना राबवुन उर्जा बचत करुन वार्षीक बिलात बचत करणे. | १)प्रभागा मधील विकास कामे कामाचे आदेश दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत. २)दिवे दुरुस्ती कामे- २ दिवस | |
| २ | उप-अभियंता | | | | | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | | | | | |

कलम ४ (१) (b) (v)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील इ क्षेत्रीय विदयुत विभाग भोसरी कार्यालय येथील सार्वजनीक प्रधीकरणात होणा-या कामासंबधी सर्व सामान्यपने आखलेले नियम

| अ.क्र | विषय | संबधीत शासकीय निर्णय/कार्यालयीन आदेश/नियम/राजपत्र वगैरेची क्रमांक व तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| १ | इ प्रभाग अंतर्गत दिवाबत्तीची देखभाल दुरुस्ती कामे करणे. | संबधीत कामाच्या निविदा अटी व शर्तीची प्रत सादर करणेत आलेली आहे. | |

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी पुणे- ४११ ०१८**
**विद्युत विभाग**
**सन २०१९-२० निविदा अटी-शर्ती (दि. ०१/०१/२०१९ पासून लागू)**

१) सदर टेंडर नोटीस https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

२) **A)** निविदा धारकाने निविदेची फॉर्म फी व बयाना रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टिमद्वारे (ई-बँकीग) भरावयाची आहे. ठेकेदारांना कामाचे देयक E.C.S/ NEFT व्दारे अदा करण्यात येतील याबाबत ठेकेदाराने मनपाचे वेबसाईटवरील जोडपत्र-'अ' मधील ई-पेमेंटसाठी नमुना फॉर्म भरून देणे आवश्यक आहे.

इसारा रक्कम ( Earnest money Deposit) खालीलप्रमाणे भरावी.

i) र. १.५० कोटी रकमेपर्यंतची कामे:- निविदा रकमेच्या १%

**B)** ठेकेदार महापालिकेत महापालिकेच्या विदयुत विभागात नोंदणीकृत असणे आवश्यक असणार नाही. तथापि https://mahatenders.gov.in वर ई नोंदणी करणे आवश्यक राहिल. तसेच **१.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदा करीता महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी बंधनकाराक राहील.** व मनपाच्या सर्व अटी शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल. निविदा भरल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत/कोणत्याही टप्प्यावर पात्र असुनही माघार घेतल्यास अशा ठेकेदारासह सर्व पात्र ठेकेदारांचे दराचे पाकिट उघडणेत येईल.

३) निविदेसोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. ( पोर्टलवर अपलोड करणे.)

i) लगतच्या ३ वर्षाचे आयकर रिर्टन प्रमाणपत्र.(आवश्यकतेनुसार)

ii) GST नोंदणी प्रमाणपत्र.

iii) PWD / CPWD / MJP / MES यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र प्रत.

iv) महाराष्ट्र शासन उद्योग व उर्जा विभागाकडिल अद्यावत "विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्ती" नोंदणी प्रमाणपत्र.

v) पुर्ण केलेल्या / हाती घेतलेल्या कामाची, स्वतः जवळील यंत्रसामुग्री बद्दलची अद्यावत माहिती निविदा अर्ज ब १ मधील तक्ता १ ते ४ संबंधीत माहिती.

vi) भविष्य निर्वाहनिधी कार्यालयाकडिल नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत चलन प्रत.

vii) ESI नोंदणी प्रमाणपत्र (लागु असल्यास जोडणेत यावे.)

viii) भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा व पावर ऑफ अॅटर्नी

ix) बीड कपसिटी व टर्नओव्हर सर्टिफिकेट जोडण्यात यावे.

x) B-1 व B-2 फॉर्म स्वाक्षरी करून तसेच Statement I II III IV यांची पुर्तता करून द्यावी लागेल.

४) i) निविदाकार यांनी निविदेसोबत जोडलेली ( अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे.

ii) लिफाफा क्र. १ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट अल्याची बाब निविदा उघडल्यावर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहिल. मनपाचे अधिकारी जबाबदार राहणार नाही. खोटया/बनावट कागदपत्रांसाठी कंत्राटदार जबाबदार राहतील व त्यांचेवर भारतीय दंड विधान संहितेनुसार कार्यवाही पात्र राहतील. तसेच अनामत बयाणा जप्त करून त्यांना काळया यादीत टाकणेत येईल.

५) दूरसंचार, ध्वनीक्षेपन, अग्निशमन यंत्रणा बसविणे / नुतनीकरण करणे, विद्युत दाहिनी बसविणे व नुतनीकरण कामाकरिता PWD / CPWD / MJP / MES यांचेकडील रजिस्ट्रेशनची आवश्यकता नाही.

६) निविदेसोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करुन देणे आवश्यक असुन निविदा बीड लॉक झालेनंतर निविदांबाबत खालीलप्रमाणे कागदपत्रांची "हार्ड कॉपी" एका प्रतीत ७२ तासाचे आत प्रती प्रमाणित करून सादर करावी. अन्यथा दराचे दुसरे पाकीट उघडणेत येणार नाही व यास संबंधित ठेकेदार जबाबदार राहिल.

७) ठेकेदार पात्र/अपात्र तक्ता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील, अपात्र ठेकेदार यांनी त्यांचे म्हणणे प्रसिध्दीचे दिनांकापासून ३ दिवसात लेखी स्वरुपात विभागात सादर करावे. तदनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

८) विद्युत दाहिनी नुतनीकरण कामाकरिता इलेक्ट्रीक फर्नेस उत्पादित कंपनी अथवा त्यांचे अधिकृत पत्रधारक यांनी दर सादर करावेत.

९) निविदा दर हे निविदा पाकीट उघडलेचे तारखेपासून १२० दिवसाकरीता ग्राह्य राहतील परंतू अपवादात्मक परिस्थितीत ग्राह्यता कालावधी वाढवणे बाबत विभागप्रमुख व त्यांचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी विचारणा केल्यास ग्राह्यता कालावधी वाढवून द्यावा लागेल.

१०) कोणतेही कारण न देता सदर कामाची निविदा नाकारणे किंवा रद्द करणेचा अधिकार मा.आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्राधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

११) ठेकेदाराने अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% पेक्षा जास्त कमी ह्या दरांपेक्षाही कमी दराची निविदा दर केल्यास, निविदा दराबाबत निविदा उघडल्यानंतर तात्काळ सविस्तर दर पृथःकरण सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) अटीयुक्त निविदा सादर करता येणार नाही.

१३) करारनामा स्वखर्चाने दिलेल्या मुदतीत करून द्यावा लागेल. अन्यथा निविदा रद्द करणेत येईल.

१४) महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता संवर्गातील ठेकेदारांना खालीलप्रमाणे अटी शर्ती सवलत लागू राहिल.

**अ)** सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे नोंदणी करुन नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरताना सादर केल्यास, एक किंवा जास्तीत जास्त पाच कामे असे एकूण रक्कम रुपये १.५० कोटी मर्यादेपर्यंतची कामे घेता येतील. या कामांसाठी ३०% अनुभव व ७५% उलाढाल या अटीमध्ये सूट देणेत येवुन,निविदा भरणेसाठी पात्र समजणेत येईल.

**ब)** मनपाच्या सर्वसाधारण अट क्र. ९ नुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्व कामांना सुरक्षा अनामत रकमेमध्ये देणेत येणारी ५०% सुट बाबतची अट रद्द करणेत येवुन, मुद्दा अ नुसार प्रथम मिळालेल्या पाच किंवा र.रु. १.५० कोटी पर्यंतच्या कामासाठी अनामत रकमेमध्ये ५०% सुट अनुज्ञेय राहील, पुढील निविदांसाठी सर्वसाधारण ठेकेदारांप्रमाणे ५% सुरक्षा अनामत निविदा अटी शर्तीप्रमाणे भरावी लागेल.

**क)** सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना या पुर्वी एकही काम मिळालेले नाही अथवा मिळालेल्या निविदा कामांची माहिती सोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे बंधपत्र पत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहिल.

१५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएसटी/२०१७/ प्र.क्र.०८/इमा.२ दिनांक २७/०९/२०१८ अन्वये परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत ई निविदा प्रणालीद्वारे खालीलप्रमाणे भरावी लागेल. परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने " Additional performance Security Deposit " आठ दिवसाच्या आत संबधित कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करावी. यामध्ये कोणत्याही प्रकारे सवलत देय राहणार नाही.मुदतीत " Additional performance Security Deposit " सादर न केलेस L-1 यांची निविदा रद्द करणेत येवुन L-2 यांना विचारणा करणेत येईल.

**१)** निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १% पेक्षा जादा (उदा.१.०१ पासुन पुढे) ते १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% रक्कम परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून भरणे आवश्यक आहे.

**२)** निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही.

**३)** निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% ते १५% कमी दराने असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढी रक्कम परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून मनपाचे ई-निविदा प्रणालीद्वारे भरणे आवश्यक आहे. (उदा. १५% कमी दर - १% पेक्षा जास्त ते १०% पर्यंत करीता – १% व (१५% -१०%) –५% असे एकूण ६%). परफॉर्मन्स सिक्युरीटी रक्कम डी. डी./ एफ. डी. आर. अथवा बँकेची प्रतिभुती हमीव्दारे भरता येईल.

**३.१)** निविदेचा देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम सादर करणे अनिवार्य राहील.

उदा. १९ % कमी दारासाठी खालीलप्रमाणे पृथकरण :-

१०% कमी दरापर्यंत १% व

१५% कमी दरापर्यंत -( १५% -१०% =५% )

तसेच ( १९-१५ )=४% करीता (४x२ = ८% )

असे एकूण ( १+५+८=१४% )

४) लिफाफा क्र.२ (दराचे पाकीट ) उघडताना सर्व निविदाधारकांनी स्वत: किंवा त्याच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा ३ साक्षीदारांसमोर निविदा उघडण्यात येतील.

५) ज्या निविदाधारकाला काम मिळेल त्याची परफॉर्मन्स सिक्युरीटी नियमानुसार काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर परत मिळेल.

६) बँक प्रतिभुती हमी महापालिकेने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे सादर करावी.

७) सुरक्षा ठेव खालीलप्रमाणे एकुण ५% राहील.

A) रु.१.५० कोटी पर्यंतच्या कामांकरिता (१% बयाणा रक्कम, २% FDR, २% देयकातून कपात) अशी एकुण ५% राहील.

८) FDR ची रक्कम खालील स्वरुपात भरावी तसेच सदरची रक्कम नजीकच्या १ हजारच्या पटीत असेल

A) मनपा कोषागारात रोख स्वरुपात भरावी व त्याची मुळ पावती विभागाकडे सादर करावी.

B) भारतीय डाक विभागाकडील राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेले

C) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल्ड बँकेकडील बँक गॅरंटी स्वरुपात, आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, मनपाचे विहित नमुन्यात, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेली.

D) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल्ड बँकेकडील मुदतठेव प्रमाणपत्र, आयुक्त, पिं.चिं.मनपा. यांचे नावे, पिंपरी चिंचवड शहर येथे देय असलेले.

१६) i) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२, कंत्राटी कामगार(नियमन व निर्मुलन ) अधिनियम १९७० या कायद्यातील सर्व कायदेशीर बाबीची पूर्तता स्वत: ठेकेदार यांनी करावयाची आहे.

ii) ESI / PF पूर्तता करणे तसेच कामगार संख्या त्यांची हजेरी व वेतनपत्रके इ. कागदपत्रे कामाच्या साईटवर ठेकेदार यांनी उपलब्ध करावयाची आहे. तसेच देयेके सादर करताना कर्मचारी संख्या व त्यानुसार भरलेल्या कर्मचारी निहाय PF ची चलने प्रत्येक बिलासोबत जोडणे आवश्यक आहे. सदरची पुर्तता देयेके सादर करताना आवश्यक आहे.

१७) शासनाकडील सुधारित/ नविन कर/ फी भरण्याची व पूर्तता करणेची जवाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

अ) G S T बाबत.

i) ठेकेदारांनी निविदेचा दर देताना जीएसटी वगळून इतर सर्व करांचा विचार करुन द्यावा. निविदा स्वीकृत रक्कमेवर प्रचलित दराने वस्तु व सेवा कर विकास कामाचे बिलात अदा करणेत येईल.

ii) महापलिकेने वेळोवेळी वस्तु व सेवाकराबाबत अवलंबविलेले धोरण कळविणेत येईल व ते ठेकेदारांवर बंधनकारक राहिल.

१८) निविदेच्या B-1 व B-2 फॉर्म मधील अटी व शर्ती ठेकेदारांवर बंधनकारक राहतील याची ठेकेदारांनी काळजीपुर्वक नोंद घ्यावी.

१९) ज्या ठेकेदारास कामाचे आदेश देण्यात येतील अशा ठेकेदारांनी सदर कामाचा व कामगारांचा सर्वसमावेशक विमा (Contractor All Risk Insurance Policy) महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विमा निधीकडे किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या विमा कंपनीकडे उतरविणे बंधनकारक आहे.

२०) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती)अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १% उपकर ठेकेदारांचे बिलातून वसूल करण्यात येईल.तसेच शासनाकडील शासन निर्णायानुसार वेळोवेळी आकारण्यात येणारे कर/फी ही ठेकेदारावर बंधनकारक असेल.

२१) वार्षिक स्वरूपाची देखभाल दुरूस्तीची कामे तातडीने करणे अपेक्षित असलेने कनिष्ठ अभियंता / उपअभियंता यानी सुचित केलेल्या कालावधीतच कामे पुर्ण करणे बंधनकारक राहील. सदर कालावधीत काम न झाल्यास प्रतीदिन किमान र.रू. १००/- (शंभर फक्त) प्रमाणे नुकसान भरपाई वसूल केली जाईल. तसेच अनावश्यक व जाणून बुजून विलंब केला जात असल्याचे निदर्शनास आल्यास वाढीव नुकसान भरपाईची कार्यवाही निविदा अटीप्रमाणे केली जाईल. अशा स्वरूपाची कामे करताना ठेकेदार यांनी किंवा त्यांचे जबाबदार अधिकृत प्रतिनिधी कनिष्ठ अभियंता / उपअभियंता यांचेशी नियमीत संपर्क व समन्वय राखणे आवश्यक आहे. व केलेल्या कामाचा संक्षिप्त अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

२२) ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल अशांकडून करारनामा करणेपूर्वी असा ठेकेदार/ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यमान नगरसेवक / स्विकृत सदस्य यांचेशी संबंधित नाही याची खातरजमा होणेकरीता र.रू. १००/- चे जनरल स्टँम्पपेपरवर संबंधित ठेकेदार /ठेकेदारी संस्थेस प्रतिज्ञापत्र करून द्यावे लागेल.

२३) ज्या कामांच्या शेड्युल बी मध्ये एल.ई.डी. फिटींगची बाब समाविष्ठ आहे, अशा एल.ई.डी. फिटींग संबधीत सविस्तर तांत्रिक विवरण निविदा सुचनेसोबत जोडलेले आहे. त्याचे गांर्भीयाने अवलोकन व्हावे.

२४) कामावर वापरलेले साहित्य कमी दर्जाचे आढळुन आल्यास, असे साहित्य ठेकेदाराने स्वखर्चाने काढून, त्याऐवजी योग्य प्रतीचे साहित्याचा पुरवठा व उभारणी स्वखर्चाने करुन द्यावी लागेल तसेच यंत्रणा कार्यान्वित केल्यापासून रोहित्र व एल.ई.डी. फिटींग व्यतिरिक्त १ वर्ष हमी कालावधी राहिल. निविदा सुचनेसोबत

जोडलेल्या मान्यताप्राप्त साहित्याचे यादीचे अवलोकन व्हावे. निविदा सादर करण्याचे मुळ तारखेस मान्यता असलेले साहित्यच फक्त वापरता येईल.

२५) हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचुक व परिपुर्ण रित्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारकनिर्णय राहील. तसेच देय कामांसाठी निविदा सादर केल्यानंतर बीड लॉक झाल्यानंतर पण त्यासंबधी अंतिम निर्णय होण्यापुर्वी एखादे नविन काम मिळाल्यास त्या संबधीची माहीती त्वरित सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार ते यथोचित कारवाईस पात्र राहतील.

२६) विद्युत कामांचा दर्जा इंडियन इलेक्ट्रीसीटी कायदा व नियमानुसार करुन सदर उभारणी चालु करण्यास योग्य असलेचा दाखला आवश्यकतेप्रमाणे विद्युत निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडुन स्वखर्चाने सादर करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच काम पुर्ण केलेनंतर सदर काम कार्यान्वित करुन मनपास/मराविवि कंपनीस मुदतीत हस्तांतरीत करण्याची जबाबदारी ठेकेदारीची राहील. महानगरपालिकेच्या वेबपोर्टलवर निविदा विभागात विद्युत विषयक कामांचे तपशिल पार्ट १ व पार्ट २ मधील नमुद सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

२७) मराविवि कंपनी संबधीचे कामाबाबत त्यांचे अधिका-याशी समन्वय साधुन कामाची अदांजपत्रके तयार करुन घेणे व सर्व अंदाजपत्रकांना मंजुरी घेणे, पर्यवेक्षकीय शुल्क अदा करणे आणि कामे त्यांचे पर्यवेक्षणाखाली पुर्ण करणे, मराविवि कंपणीस हस्तांतरण करणे ठेकेदारावर बंधनकाराक राहील. अंदाजपत्रक मंजुरीस विलंब लागला ह्या सबबीवर मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच म.रा.वि.वि. मंडळाची मंजुर अदाजपत्रकाची प्रत ठेकेदाराने सादर केल्याशिवाय प्रथम चालु बिल देणेत येणार नाही. हस्तांतरण झाले शिवाय अंतिम बिल अदा केले जाणार नाही.

२८) i) अग्निशमन व प्रतिबंधक यंत्रणेचे कामाकरीता कामास सुरुवात करणेपुर्वी व काम पुर्णत्वानंतर वेळोवेळी आवश्यक असणा-या चाचण्या, तपासण्या व त्यानुसार कायदेशीर आवश्यक ठरणारी प्रमाणपत्रे, सक्षम अधिका-याचे कार्यालयातुन स्वखर्चाने प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

ii) अग्निशमन व प्रतिबंधक यंत्रणेच्या कामाकरिता महाराष्ट्र फायर सर्व्हीसेस ( Directorate of Maharashtra Fire services) यांचेकडील मान्यताप्राप्त अनुज्ञप्ती असणे आवश्यक आहे.

iii) अग्निशमन व प्रतिबंधक संपुर्ण यंत्रणेची तपासणी व चाचणी महिन्यातुन दोनवेळा करावी लागेल. तसेच सदर चाचणी अभियंतांच्या देखरेखखाली करुन तपासणी/चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सहा महिन्यातुन एकदा मनपा अग्निशामक विभागाकडिल अधिकारी/कर्मचा-याच्या उपस्थितीत चाचणी (Mock Drill) करुन देणेची जबाबदारी संबधित एजन्सीची राहील.

२९) ज्या ठेकेदारास कामाचा आदेश दिला जाईल, त्याकडून पुरवठा केलेल्या साहित्यांपैकी, संबंधित कार्यकारी अभियंता मागणी करेल, त्या साहित्यांची तांत्रिक तपासणी शासकीय प्रयोग शाळेतुन स्वखर्चाने मुदतीत करुन द्यावी लागेल व प्रथम बील अदायगीपुर्वी टेस्ट रिपोर्ट सादर करावे लागतील. एल.ई.डी. फिटींग संबधीत सविस्तर तांत्रिक विवरण व विशेष नोंदीचे अवलोकन करुन दर द्यावेत. तसेच मा.विद्युत निरिक्षक यांची वीजसंच मांडणी / जनित्रसंच कार्यान्वीत करण्याची परवानगी घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३०) i) कामांवर वापरावयाचे साहित्याची तांत्रिक तपासणी, कार्यकारी अभियंता यांचे आवश्यकतेनुसार, उत्पादक कंपनीच्या उत्पादन स्थळी ठेकेदाराने स्वखर्चाने करुन देणे व तात्रिंक क्षमता प्रमाणपत्र सादर करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

ii) मराविविकंलि संबधित कामासाठी, मराविविकंलि कडील अभियंता यांचेसह उत्पादकाचे उत्पादनस्थळी तांत्रिक तपासणी प्रमाणपत्र सादर करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यानंतर साहित्यापोटी प्रथम बील अदा करणेत येईल.

३१) शेड्युल बी मधील नमुद बाबी संबंधीत मा.मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कडील सविस्तर तांत्रिक विवरण दर्शविणारे दस्त मनपा वेबपोर्टलवर प्रसिद्ध केले आहे त्यांचे कृ. अवलोकन करुनच त्यानुसार काम करणे बंधनकारक राहील.

३२) करारनामा मा. स्थायी समिती सभा सदस्यांकडुन स्वाक्षरीत व मोहोरबंद झाल्या शिवाय कामाचे आदेश दिले जाणार नाही.

३३) महाराष्ट्र शासनाकडील बालकामगार कायदा व अन्य कायदे यांची पुर्तता करणे संबंधीत ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३४) एजन्सीने / ठेकेदाराने काम करताना सर्व सुरक्षीत उपकरणांचा वापर करणे तसेच कामगारांना सुरक्षीत उपकरणे देणेची जबाबदारी एजन्सीची राहील. तसेच कामावर पर्यवेक्षक नेमणे आवश्यक आहे, अन्यथा कडक कारवाई करणेत येईल. विभागाकडील कनिष्ठ अभियंता / पर्यवेक्षक यांचे समक्ष काम करणे बंधनकारक राहील.

३५) मराविविकं संबंधीत कामातील साहित्याचा हमी कालावधी १८ महिने राहिल व कामाचे वर्कमनशिप करितांचा कालावधी ६० महीने इतका राहील.

३६) कामांअंतर्गत कोणत्याही बाबींसाठीचे, रस्त्यास समांतर अथवा आडवे खोदकाम करताना इतर कोणत्याही बाबींचे नुकसान झाले तर त्याची स्वखर्चाने भरपाई करुन देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच काम पुर्ण झाल्यावर सदर ठिकाणचा रस्ता/फुटपाथ/पेव्हींग ब्लॉक, रस्त्यावरील सर्व राडारोडा उचलुन रस्ता समपातळीत करुन द्यावा. जर सदर कामाची गुणवत्ता / दर्जा राखला नाही तर, सदर कामावरील होणारा दुरुस्तीचा खर्च अंतिम बिलातून अथवा सुरक्षा ठेव रकमेतून वसुल करणेत येईल. रस्त्यावरील खोदाई व रस्त्यास समांतर/आडवी खोदाई करणेपुर्वी सदर खोदाईस स्थापत्य विभागाची परवानगी आहे काय ? याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

३७) काम करताना कोणत्याही प्रकारचा अपघात अथवा प्राणहानी झाली तर त्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी फक्त संबंधीत ठेकेदाराची राहील.

३८) काम करताना कोणत्या ही बाबींचे शेड्यूल बी मधील परिमाणामध्ये २५% पेक्षा जास्त वाढ होणार असल्यास, मा. कार्यकारी अभियंता (वि) यांचे लेखी पुर्व परवानगी शिवाय वाढीव काम करु नये. २५% त्या पेक्षा परिमाणात वाढ झाल्यास त्याच वाढीव दराने दर न देता निविदा दरानेच दर दिला जाईल.

३९) काम करतेवेळी जादा बाब करावी लागल्यास, जर सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी दराची असेल तर, सदर निविदा स्विकृती दराने जादा बाबीसाठी दर मंजूर केला जाईल. निविदा जादा दराची असेल तर जादा बाबींसाठी अंदाजपत्रकीय दराने (At Par)जादा बाबीचे काम करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. परिशिष्ट ब ज्या वर्षाच्या दर सुचीनुसार बनविले आहे. त्याच वर्षाच्या बाब दर सुचीच्या संदर्भाने जादा बाबींचा व अंदाजित दराचा विचार केला जाईल.

४०) परिशिष्ट – ब मध्ये नमुद असलेले परिमाण अदमासे आहे. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर ठेकेदाराने पिं.चि.मनपाचे कनिष्ठ / उप अभियंता यांचेसह सत्वर संयुक्तित कार्यस्थळ पाहणी करुन, बाबनिहाय आवश्यक साहित्याचे परिमाणाची निश्चिती करावी व त्यास मा. कार्यकारी अभियंता (वि) यांची मान्यता घ्यावी व त्यानुसार बाजारातून साहित्य उपलब्ध करुन घ्यावे. आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी केलेल्या परिमाणासाठी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही अथवा त्याची जबाबदारी मनपाची राहणार नाही. ज्या परिमाणाकरिता आगाऊ रक्कम अदा केली आहे असे सर्व साहित्याची साईटवरुन उभारणी करणे आवश्यक आहे. शिल्लक राहणारे साहित्य पिं. चिं. मनपा ताब्यात घेणार नाही व अंतिम देयक अदा करतेवेळी शिल्लक राहिलेल्या साहित्याची नियमाधीन रक्कम वसुलात आणणेत येईल ह्याची नोंद घ्यावी.

४१) कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरुस्ती या कामाकरिता शासकीय/निमशासकीय संस्थेत काम केलेबाबतचा अनुभव असल्याची आवश्यकता नाही.

४२) एलईडी फिटींग संबधित कामासाठी खात्याकडुन पुरवठा होणा-या खिळण्या, एलईडी फिटींग, पोल, केबल मनपा कोठार विभाग/तक्रार निवारण केंद्राकडुन घेवुन ती बसविणेची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील. खिळण्या,एलईडी फिटींग, पोल, केबल करिता आवश्यक विमा ठेकेदारास काढावा लागेल. खिळण्या, एलईडी फिटींग तपासुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. कोठार विभागातुन प्राप्त झालेल्या खिळण्या, एलईडी फिटींग, केबल, पोल्स सुरक्षितपणे सुस्थितीत बसविणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील. जुन्या खिळण्या, एलईडी फिटींग खांबावर असल्यास आहे त्या स्थितीत काढुन, मनपाकडे आहे त्या स्थितीत जमा करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील

i) शेड्युल बी मधील एकुण एलईडी फिटींगच्या संख्येच्या १० % इतक्या तत्सम मनपा मान्यता प्राप्त उत्पादीत फिटींग ठेकेदाराने ब्रेकडाऊन दुरुस्तीकरिता स्वखर्चाने स्वत:कडे राखुन ठेवणे बंधनकारक आहे व तसे मनपाने दिलेल्या नमुन्यामध्ये स्टॅम्प पेपरवर लेखी स्वरुपात दिल्याखेरीज अंतिम बील अदा केले जाणार नाही. तसेच उक्त फिटींग ५ वर्षे कालावधीपर्यंत ठेवणे बंधनकारक राहील.

ii) निविदेनुसार बसविलेल्या एलईडी फिटींग पैकी बंद असलेल्या फिटींगची माहिती ठेकेदारास ई- मेल/ एसएमएस/लेखी/भ्रमणध्वनीद्वारे कळविल्यानंतर २ दिवसात नविन फिटींग बसविणे अथवा दुरुस्त करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. अन्यथा प्रतिदिन प्रती फिटींग र.रु.२००/- इतके शुल्क १५ दिवसांपर्यंत वसुल करण्यात येईल व त्यानंतर त्यापुढे प्रतिदिन प्रति फिटींग र.रु.३००/- इतके शुल्क नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.

iii) नादुरुस्त एलईडी फिटींग बदलण्याचे संपुर्ण काम ठेकेदाराने स्वतःची यंत्रणा व कामगार वापरुन स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

iv) ठेकेदाराने निविदे अंतर्गत वापरावयाच्या एलईडी फिटींगच्या उत्पादकाने ५ वर्ष दुरुस्तीसाठी ठेकेदाराच्या नावाने दिलेल्या हमीपत्राची प्रत या कामाचा मनपाशी करारनामा करण्यापुर्वी सादर करणे बंधनकारक राहील. एल.ई.डी. फिटींग बसविणेच्या कामाचा हमी कालावधी ५ वर्षे राहील.

v) निविदा कामातील साहित्यांमधील एलईडी फिटींग,केबल,जीआय पोल इ.साहित्याचे तांत्रिक तपासणी मनपा नेमणुक करेल त्या त्रयस्त संस्थेकडुन मनपाने ठरवुन दिलेल्या दराने ठेकेदाराने स्वखर्चाने करुन घेणे व त्याचा अहवाल मनपास बंधनकारक राहिल. सदरच्या अहवालानंतर संबधीत साहित्याचे बील अदा करण्यात येईल.

४३) ट्रॅफिक सिग्नलचे देखभाल दुरुस्ती व उभारणीचे कामासाठी एजन्सीकडे Traffic Signal मधील बाबीचे District industries center यांचेकडील स्वत: नोंदणीकृत उत्पादक असलेबाबत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

४४) ट्रॅफिक सिग्नलचे देखभाल दुरुस्ती व उभारणीचे शासकीय/निमशासकीय संस्थेत काम केलेले असणे बंधनकारक नाही.

४५) I) लिफ्ट करिता लागणा-या सर्व आवश्यक परवानग्या व ना हरकत दाखले प्राप्त करणेची जबाबदारी ठेकेदारांची राहील. तसेच शासनाचे निरीक्षण शुल्क व इतर आवश्यक सर्व शुल्क अदा करण्याचे जबाबदारी ठेकेदाराची राहील. मनपा यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क ठेकेदारांस अदा करणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

४६) i) तात्पुरती ध्वनीक्षेपण व विद्युत व्यवस्था करणे कामातंर्गत मा. कार्यकारी अभियंता (वि) यांनी कामाच्या आवश्यकतेनुसार मागणी केल्यास विद्युत निरीक्षक, पुणे यांचे प्रमाणपत्र घेणे व त्याकरिता आवश्यक शुल्क अदा करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

ii) अतिमहत्वाच्या व्यक्ती संबधित कार्यक्रमांकरीता तथा मनोरंजन विशेष कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपन व्यवस्था उभारणीचे व कार्यक्रमाचे वेळी ध्वनीक्षेपन व्यवस्था चालनाचे कामाकरीता अनुभवी साऊंड इंजिनिअर नियुक्त करणे बंधनकारक आहे. तसे प्रतिज्ञापत्र देणेत यावे.

४७) दुरसंचार विभागाकडील वायरलेस व वॉकीटॉकी संदर्भातील कामासाठी वर्क ऑर्डरचे पुर्वी अग्रिमेंट करताना संबधित ठेकेदाराने Govt of India चे संचार मंत्रालयाकडील DPL " Dealer possession License " सादर करणे बंधनकारक आहे.

४८) मनपा प्रशासकीय इमारतीमधील जनित्रसंच/ लिफ्ट दुरुस्तीचे काम हे उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक/विक्रेते यांचेकडुन पार्टस बदलणे, सर्व्हिसिंग करुन घेणे, ठेकेदारास बंधनकारक राहील.

४९) i) ज्या कामाचा काम पुर्णत्वाचा विहीत कालावधी १२ महीने व त्यापेक्षा कमी आहे अशा कामांना भाववाढीचे कलम लागु राहणार नाही.

ii) ज्या कामांसाठी १००% तरतुद उपलब्ध आहे, अशा कामाच्या निविदेमध्ये भाववाढ कलम व स्टार रेटची तरतुद लागू राहणार नाही. तसेच ज्या कामांचा काम पुर्णत्वाचा विहित कालावधी १२महिने वा त्यापेक्षा कमी आहे. व रक्कम रु. १ कोटी पेक्षा कमी असलेल्या कामांना भाववाढ कलम लागु राहणार नाही.

५०) निविदाधारक व मनपामध्ये कामाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा वाद/विवाद उद्धवल्यास लवादाच्या कायद्यातील तरतुदीनुसार सोडविला जाईल. तसेच त्याकामी मा. आयुक्त पि.चि.मनपा यांचा एक पर्यायी लवाद राहील. लवादाचा निर्णय उभय पक्षावर बंधनकारक राहील.

५१) न्यायालयीन बाब उद्धवल्यास पुणे-पिंपरी न्यायालय कार्यक्षेत्र राहील.

५२) कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे

५३) काम चालू करण्यापूर्वी, काम चालू असताना, काम पूर्ण झाल्यानंतर, स्वखर्चाने कामाचे फोटो /व्हीडीओ शुटींग काढणे व अपलोड करणे हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

५४) विद्युत विभागाचे क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विषयक कामांसाठी एका ठेकेदारास (संस्थेस) एका क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रात एका आर्थिक वर्षामध्ये जास्तीत जास्त **(५) पाच** कामे घेता येतील.

**सही/-**

कार्यकारी अभियंता (वि)
इ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८